**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर
संपादक/वृत्तसंपादक

(हनुमंत गोफणे)
जनता संपर्क अधिकारी
बेस्ट उपक्रम
दूरध्वनी क्र.२२७९९३९५

---

प्रसिध्दी पत्रक क्र.२०
दिनांक : १८.०९.२०१७

## 'महालक्ष्मी जत्रे'साठी 'बेस्ट'च्या जादा बसगाड्या

मुंबई, १८ - दिनांक २१.०९.२०१७ ते ३०.०९.२०१७ या कालावधीत साज-या होणा-या 'नवरात्रौत्सव' निमित्ताने महालक्ष्मी मंदिरात जाणा-या भाविकांच्या सोयीसाठी याही वर्षी बेस्ट उपक्रमातर्फे बसमार्ग क्र.३३, ३७, ५७, ६३, ८३, १२४, १५१, आणि ३५७ तसेच संत गाडगे महाराज चौक (सातरस्ता) ते महालक्ष्मी मंदिर दरम्यान 'महालक्ष्मी विशेष-८१११' या बसमार्गावर अशा एकूण २० जादा बसगाड्या चालविण्यात येणार आहेत. तसेच शनिवार, दिनांक ३०.०९.२०१७ दसरा सणाच्या दिवशी बसमार्ग क्र.६३ वर भायखळा स्थानक (प.) ते महालक्ष्मी मंदिर दरम्यान ३ जादा बसगाड्या चालविण्यात येणार आहेत.

प्रवाशांच्या मदतीसाठी वत्सलाबाई देसाई चौक (हाजीअली), वसंतराव नाईक चौक (ताडदेव), जे.मेहता मार्ग, भायखळा रेल्वेस्थानक (प), महालक्ष्मी रेल्वे स्थानक आणि महालक्ष्मी मंदिर येथील बसथांब्यावर बसनिरीक्षकांची व अधिका-यांची नेमणूक करण्यात येणार आहे.

सर्व बसप्रवाशांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी या जादा बसगाड्यांची नोंद घेऊन, उपलब्ध केलेल्या बससेवेचा जास्तीत-जास्त लाभ घ्यावा.

***************